IIPIMRJ | IIP International Multidisciplinary Research Journal

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# शाश्वत विकास आणि भारतीय शेती पुढील आव्हाने

**प्रा. बर्वे सिद्धार्थ भागाजी**
**सहायक प्राध्यापक**
अर्थशास्त्र विभाग, महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा जि. अहिल्यानगर

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
भारतीय शेती,
शाश्वत विकास

**ABSTRACT**

शाश्वत विकास आणि भारतीय शेती पुढील आव्हाने या विषयावर शोधनिबंध सादर करत आहे. सदर शोध निबंध तयार करताना दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे. त्यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत शाश्वत विकासाचे महत्त्व विविध मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे शाश्वत विकासाची ध्येय उद्दिष्टे विस्तारात्मक पद्धतीने सांगितले आहेत. शाश्वत विकासासाठी असणाऱ्या अन्य उपाययोजना विविध मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करून सांगितलेले आहेत.

सदर शोधनिबंधात भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्रासमोरील असणारी आव्हाने, शेतीचे नवीन तंत्रज्ञान, शेतकऱ्यांना करण्यात येणारा वित्तपुरवठा, शेतकऱ्यांना दिलेला हमीभाव, शेती क्षेत्रामध्ये दिसून येणारी बेरोजगारी, सिंचनाच्या शेतीसाठीच्या सुविधा, बाजार भाव, आणि आलीकडे लागू केलेल्या पिक विमा योजना, त्याचप्रमाणे शेतीसाठी मिळणारा हमीभाव, शेतमालाच्या किमती, विभक्त कुटुंब पद्धती इत्यादींचे विश्लेषण केले आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Barve, S. B. (2025). **शाश्वत विकास आणि भारतीय शेती पुढील आव्हाने.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 834–842.

**प्रस्तावना**

भारतात फार पुरातन काळापासून शेती केली जाते. भारतात आजही जवळपास 68% लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत. शेती हेच ग्रामीण लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. म्हणूनच भारतीय शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हटले जाते. भारतीय शेतकरी हा उभ्या जगाचा अन्नदाता किंवा पोशिंदा ठरला आहे. आज राष्ट्रीय उत्पादनात म्हणजेच जीडीपीमध्ये शेतीचा वाटा जवळपास 18% इतका आहे. 50 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्येला रोजगार पुरवण्याचे काम करते आहे. शेतीचा विकास म्हणजे शेतीतील उत्पादकता आणि शाश्वतता वाढविण्यासाठी शेती पद्धती, पायाभूत सुविधा आणि संसाधन व्यवस्थापनात सुधारणा करणे होय. यामध्ये प्रगत तंत्रज्ञान,पिकांच्या चांगल्या प्रजाती, सिंचन सुविधा, खते आणि कीटकनाशकांचा प्रभावी वापर इत्यादीचा समावेश होतो.

**तथ्य संकलन**

शाश्वत विकास आणि भारतीय शेती पुढील  आव्हाने या शोधनिबंधाचा अभ्यास करताना दुय्यम साधनसामग्रीचा वापर केला आहे.

संशोधन पद्धती

चिरंतन विकास आणि त्याचा भावी पिढ्यांना फायदा याचा अभ्यास करताना विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**अभ्यासाचे महत्त्व**

भारतातील बहुतेक जनता शेतीवर उदारनिर्वाह करीत असली तरी त्यांच्या उत्पन्नात व जीवनमान पातळीत फारसा बदल झालेला नाही. त्याची कारणे समजून घेऊन उपाययोजना करणे शक्य होते.

शाश्वत विकासाचा अर्थ :-

शाश्वत विकास म्हणजे, चिरकाल टिकणारा विकास होय.याचा अर्थ,सध्या जो विकास होत आहे तो भविष्यकाळातही टिकून ठेवणे होय. उद्याच्या काळात कितीही समस्या निर्माण झाल्या तरीही कोणतीही तडजोड न करता गरजपूर्ती करणे होय. शाश्वत विकास हा सर्व शासनासाठी अनिवार्य घटक बनला आहे. शाश्वत विकास म्हणजे जो विकास मानवी गरजांचे समाधान कायम टिकून ठेवतो आणि मानवाचा जीवन दर्जा सुधारतो हे होय.

**शाश्वत विकासाचे महत्त्व**

1. दारिद्र्य निर्मूलन

शाश्वत विकासात दारिद्र्य निर्मूलनावर भर दिला आहे. बहुतेक देश दारिद्र्यात असून त्यांना मूलभूत गरजा ही भागवता येत नाहीत. तसेच बहुसंख्य विकसनशील देश हे दारिद्र्याच्या समस्येने ग्रासले गेले आहेत.

यासाठी आर्थिक वृद्धी गतिशील होणे गरजेचे आहे. दारिद्र्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. दारिद्र्य निर्मूलन ही शाश्वत विकासाची गुरुकिल्ली आहे.

2. नैसर्गिक साधनांचा वापर व संवर्धन

नैसर्गिक साधनांचा वापर करणे,संवर्धन करणे हे शाश्वत विकासाचे तत्व आहे. ही साधने वापरताना मानवाने सद्य व भावी पिढ्यांसाठी मोठी देण निर्माण करावी. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता साधनांचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे.

3.पर्यावरण संरक्षण

पर्यावरणाचे रक्षण करणे हे शाश्वत विकासाचे तत्व आहे.पर्यावरणाचे रक्षण न केल्यास विकासाची प्रक्रिया क्षीण,दुर्बल व कमजोर बनते. पर्यावरणाची धोरणे विकासाची गती वाढवून पूरक ठरतात. तसेच विकासाला बळकटी आणतात. पर्यावरणाचा ऱ्हास व प्रदूषण यामुळे श्रीमंतांपेक्षा गरिबांना जास्त झळ पोहचते. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज बनली आहे.

4. विकासानशील देशांना सहाय्य करणे

दारिद्र्य ही सर्वच विकसनशील देशांची समस्या ठरते. दारिद्र्यामुळे या देशांतील लोक गरजेसाठी नैसर्गिक साधनांचा हवा तसा वापर करतात. तसेच या देशांकडे कायमस्वरूपी विकासासाठी पैसा,नवीन तंत्रज्ञान नसते. त्यातून पुढे पर्यावरणाची हानी होते.म्हणूनच विकसित देशांनी विकसनशील देशांना पर्यावरणाचे रक्षण व्हावे म्हणून अर्थसाह्य व नवीन तंत्रज्ञान पुरवावे.

5. नुकसान भरपाई तत्व

शाश्वत विकासात हे तत्व महत्त्वाचे आहे. हे तत्व असे दाखवते की, जो पर्यावरण आणि पोहोचवेल त्याने पर्यावरण आणि बळी पडलेल्यांना योग्य नुकसान भरपाई दिली पाहिजे. असेच पर्यावरण हानी भरून काढण्यासाठी किंमतही मोजावी लागेल.

6. मदत,सहकार्य किंवा कर्तव्य

पर्यावरण प्रदूषण आणि ही एका व्यक्ती किंवा देशाची समस्या नाही. तर ती जागतिक समस्या ठरली आहे. म्हणून या समस्येचे निराकरण करण्यासाठी देशातील सर्व जनतेने परस्पर सहकार्याने एकत्र येऊन प्रश्न सोडवावेत. त्यासाठी आवश्यक ज्ञान व साधनांची देवाण-घेवाण केली पाहिजे.

**शाश्वत विकासाची ध्येय किंवा उद्दिष्टे**

1. गरीबी निर्मूलन

देशातील दारिद्र्याचे पूर्णतः निर्मूलन घडवून आणणे यात कमी पैशात उदरनिर्वाह करणारे लोक येतात. सरकारने साधारणतः 2030 पर्यंत दुर्बल घटक आणि गरिबांसाठी व्यापक स्वरूपात विकास साधनेचे ध्येय समोर ठेवले आहे. यामध्ये आर्थिक साधने,सेवा पायाभूत सुविधा यावर भर दिला आहे.

2. उपासमारीचे समूळ उच्चाटन

उपासमारी नष्ट करणे, अन्नसुरक्षा,पोषण आहार,शाश्वत शेतीला गती देणे,गरिबी, दुर्बल गटातील घटकांतील सर्व लोकांना सुरक्षितता, पोषण व पुरेसे अन्न याबाबत ध्येय ठेवणे. 2030 सालापर्यंत कुपोषण नष्ट करून उत्पादन व उत्पादकता वाढविण्यावर भर देण्यात यावा. तसेच,विकसनशील देशात शेती उत्पादकता वाढवण्यासाठी पायाभूत विकास कृषी संशोधन व विस्तार सेवा, तंत्रज्ञान,विकास यासाठी मोठी गुंतवणूक करणे व विकास साधने होय.

3. निरोगी पणा व श्रम कुशलता

सर्वच वयोगटांसाठी उत्तम आरोग्य जीवनमान उंचावणे, 2030 पर्यंत एड्स,क्षयरोग,हिवताप, कावीळ, तसेच पाण्यापासूनचे रोग यांचा मुकाबला करणे. 2030 सालापर्यंत रस्ता दुर्घटनेतील अपघातांमुळे होणारे मृत्यू,अपघात, दुखापती यांचे प्रमाण कमी करणे. तसेच 2030 पर्यंत घातक रासायने,हवा, जल,माती प्रदूषण इत्यादी पासून होणारे आजार व मृत्यू यांचे प्रमाण कमी करणे.

4. शिक्षण

सर्वांसाठी समान न्याय,सर्व समावेशक गुणवत्तापूर्ण शिक्षण,संधींना वाव देणे यात 2030 पर्यंत शिक्षणात सर्व मुली व मुली यांना पूर्णतः मोफत गुणवत्ता पूर्ण प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देणे. तसेच 2030 पर्यंत सर्वांना प्राथमिक शिक्षण दर्जेदार विकासाभिमुख स्वरूपात मिळण्याची गरज आहे. 2030 सालापर्यंत महिला व पुरुषांना तांत्रिक, दर्जेदार, व्यवसायिक, त्रिसूत्री शिक्षण समानतेने मिळत असल्याची सुनिश्चितता करणे.

समाजातील दुर्बल घटकांसाठी विद्यार्थ्यांना शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. बालक,विकलांग व लैंगिक दुर्बल घटकांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सेवा सुविधा बळकट व अद्यावत करणे.तसेच सर्वांना सर्व समावेशक अध्ययन वातावरण निर्माण करणे.

5. स्वच्छ पाणी व स्वच्छता

सर्वांसाठी स्वच्छ पाणी व स्वच्छता यांची उपलब्धता निर्माण करून देणे. सन 2030 पर्यंत जागतिक

स्तरावर सर्वांना परवडेल असे पेयजल उपलब्ध होईल असे ध्येय समोर ठेवण्यात आले आहे. आरोग्य सेवा, उघड्यावर शौचास बसण्याची प्रथा नष्ट करणे, महिला मुली तसेच दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष देण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. जल व स्वच्छता व्यवस्थापन करण्याकडे समाजाच्या सहभागासाठी सहाय्य करणे व मजबुती देणे.

6. चांगल्या दर्जाचे काम

सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी पूर्णवेळ रोजगार व प्रतिष्ठेचे काम या बाबींना चालना देणे. सन 2030 सालापर्यंत रोजगार, शिक्षण,प्रशिक्षण न घेतलेल्या युवकांच्या संख्येत घट घडवून आणणे. बाल कामगारांचे प्रश्न, वेठबिगारांचे प्रश्न सोडवणे, उपाययोजना सुचवणे, बालकामगारांची भरती व त्याचा वापर व अनिष्ट प्रथा दूर करणे.तसेच 2030 पर्यंत युवकांना रोजगार देणे हे एक जागतिक धोरण ठरावे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या ठरावाची मंजुरी व्हावी.

**शाश्वत विकासासाठी उपाय योजना**

शाश्वत विकासासाठी भारताने काही उपाययोजना सुचवले आहेत.

1. पॅरिस कराराला मान्यता

हवामान बदला विषयी एकविसाव्या परिषदेची यशस्वी सांगता झाली. क्योटो प्रोटोकॉलचे उत्तराधिकारी आणि इतर मुद्द्यांवर भर देण्यात आला. हवामान न्याय व शाश्वत विकास या मुद्द्यांवर भर देताना पॅरिस करार संपूर्ण राष्ट्रांना एकत्र करतो. या कराराचा प्रमुख हेतू म्हणजे जागतिक सरासरी तापमान वाढ करणे यावर लक्ष केंद्रित करणे होय.

2. हवामान बदलावर राज्य कृती योजना

हवामान बदलासंबंधी राज्याचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणावर क्षमतांची निर्मिती करणे आणि हवामान बदलावर तोडगा काढण्यासाठी कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे हे होय. या योजना पाणी,कृषी, पर्यटन, वनीकरण,वाहतूक,ऊर्जा इत्यादी बाबतीत सहभागासाठी अनुकूल आहेत.

3. हवामान बदलासाठी राष्ट्रीय अनुकूलन निधी

हवामानाच्या प्रतिकूल परिणामांना सामोरे जाण्यासाठी खर्च स्वरूपात मदत दिली जाते. यासाठी घटक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पातळीवर कार्यक्रम योजना राबवल्या जातात. नीती आयोगाने 17 पैकी 13 शाश्वत विकास ध्येय सर्व घटक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी एकच मापन करता येण्याजोगा निर्देशांक तयार केला आहे. हा एस डी जी निर्देशांक भारताच्या प्रगतीचे मूल्यांकन करतो. कोविड 19 नंतर साथीच्या रोगाने विकास धोरणांच्या मुळाशी शाश्वत विकासाचे ध्येय समोर ठेवले आहे.साथीच्या रोगांनी

आरोग्य, पायाभूत सुविधांना आव्हान दिले आहे. देशातील अन्न व पौष्टिक उपलब्धता यामुळे टीकेला जोर धरला आहे.साथीच्या काळात केंद्र व राज्य यात समन्वयाचे प्रयत्न दिसून येतात. अत्यंत कठीण परिस्थितीत देशाला आपल्या शाश्वत विकासाचे ध्येय प्रगती करण्यासाठी सक्षम आहे. याशिवाय,शेती,कामगार,सूक्ष्म व लघु मध्यम उद्योगांसाठी अनेक सुधारणा,उपायोजना आणल्या गेल्या आहेत.

**शाश्वत विकासाची सद्यस्थिती**

शाश्वत विकासासाठी 2030 पर्यंत 17 शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि 169 ध्येय सामाजिक आर्थिक व पर्यावरणीय परिणामांचे एकत्रीकरण करणारा व्यापक अजेंडा आहे. शाश्वत विकासाचे ध्येय, धोरणे व मुख्य कार्यक्रम यासाठी भिन्न कार्यक्रम राबवले जातात.

हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारताने अनेक राष्ट्रीय व उपराष्ट्रीय कार्यक्रम हाती घेतली आहेत.

1. भारत व शाश्वत विकासाची उद्दिष्ट

नीती आयोगाच्या निर्देशांकानुसार, आरोग्य ऊर्जा व पायाभूत क्षेत्रात संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकासाची ध्येय साधण्यासाठी भारताने सातत्याने प्रगती केली आहे.भारताचा शाश्वत विकासाचा निर्देशांक 60 वरून आतापर्यंत 66 इतका गेला त्याचे कारण म्हणजे स्वच्छ पाणी आणि स्वच्छ ऊर्जा यात खूप मोठी देशव्यापी सुधारणा झाली आहे.

2.हवामान बदल

भारताने अनेक हवामान विषयक उपक्रम राबवले आहेत. यामध्ये हवामान बदल, राष्ट्रीय कृती योजना,जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय सौर अभियान, हवामान बदल कृती योजना, हवामान बदलावरील तसेच भारतात इलेक्ट्रॉनिक वाहनांचा वापर आणि उत्पादनासाठी अंमलबजावणी इत्यादी सरकारच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांचा उल्लेख करण्यात आला आहे.

3. शाश्वत हवामान वित्तपुरवठा

समाज कल्याणकारी ध्येय साकारण्यासाठी कार्यरत असणाऱ्या सामाजिक उपक्रमातून भांडवल उभे करण्यासाठी सेबीच्या तत्वाखाली भारतीय सामाजिक शेअर बाजार उभारण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. 4.

4. जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व

विकासाचे शाश्वत प्रतिमान विकसित करण्यासाठी तसेच आपत्ती निवारण पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जागतिक पातळीवर भारताने पुढाकार घेतला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर "वर्ल्ड सोलर बँक, आणि वन सन वन वर्ल्ड वन ग्रिड इनिशिएटिव्ह"या दोन नवीन उपक्रमांची सुरुवात केली आहे.

5. आपत्ती निवारण पायाभूत सुविधांसाठी युती

सरकारच्या वतीने सर्व समावेशक बहुभागधारक म्हणून कार्य करत असतात.जेथे आपत्ती व्यवस्थापनाच्या पायाभूत पैलूंचा विचार करून त्याची देवाणघेवाण केली जाते.

**भारतीय शेती समोरील आव्हाने**

1. धारण क्षेत्राचा आकार

भारतात तुकडीकरण व विभक्त कुटुंब पद्धतीमुळे धारण क्षेत्राचा आकार लहान झालेला आहे.त्यामुळे अल्पभूधारकांची संख्या खूप मोठी आहे.छोटे धारण क्षेत्र म्हणजे,एक ते चार हेक्टर प्रति व्यक्ती जमीन होय.लहान धारण क्षेत्रामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित शेती करता येत नाही. नवतंत्रज्ञान वापरता येत नाही. असे शेतकरी इतरत्र मजूरी करताना दिसून येतात.

2. व्यापारी शेतीचा अभाव

आजही देशाच्या सर्व दूर ग्रामीण भागात बरे शेतकरी शेतीतून पारंपरिक पद्धतीने उत्पादन घेताना दिसून येतात. उदा. ज्वारी,गहू,बाजरी, मूग,तूर,हरभरा इ. याचा अर्थ व्यापारी पिके घेण्याची ताकद ग्रामीण शेतकऱ्याजवळ जास्त प्रमाणात अजूनही दिसून येत नाही परिणामी, आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

3. हमीभाव

दरवर्षी सरकार काही पिकांचा हमीभाव जाहीर करते.तो हमीभाव बाजारभावापेक्षा जास्त असेल तर शेतकऱ्यांना फायदा होतो अन्यथा,ती घोषणाच ठरते.अनेक वेळेस शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून काढता येत नाही अशी परिस्थिती दिसून येते.

4. शेतीला वित्त पुरवठा

बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा हेतू म्हणजे,गरजू लोकांना वित्तपुरवठा व्हावा हा त्या मागचा उद्देश होता. पण या वित्त पुरवठ्याचा खरा फायदा श्रीमंत शेतकऱ्यांना व जमीनदारांना झाला.

आवश्यक त्या वित्त सेवा श्रीमंत व अल्पभूधारकांपर्यंत पोहोचल्या नाहीत.त्यामुळे सावकारी दृष्ट चक्रात शेतकऱ्यांना परत परत अडकावे लागत आहे.

5. शेती संशोधन

भारतात कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून भिन्न प्रकारचे संशोधन होत असते असे संशोधन खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही. सुधारित व संकरित बी बियाणांच्या खतांच्या किमती शेतकऱ्यांना परवडत नाहीत म्हणून शेतकरी जुनाट बियाणे वापरतात व त्यामुळे उत्पादनात वाढ होत नाही आणि तोटा सहन करावा लागतो.

6. तंत्रज्ञानाचा वापर

भारतीय शेतकरी आपल्या अल्पभूधारक क्षेत्रावर नव्या तंत्रज्ञानाचा वापर करू शकत नाही .त्यामुळे,उत्पादनात मोठी वाढ होऊ शकत नाही.मालाला गुणवत्ता व दर्जा मिळत नाही परिणामी उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो.

7.शेतकऱ्यांचे ज्ञान

भारतीय शेतकरी हा ग्रामीण भागात राहतो शिक्षण कमी झालेले असल्याने बाजाराविषयी अज्ञान असतो.कोणत्या पिकाला मागणी काय ? कोणते पीक कमी खर्चात येते ? कोणती बियाणे चांगली आहेत,आणि यावर्षीचा हवामान कसे राहील,याबाबत अज्ञानी शेतकऱ्यांना कोणतीच कल्पना येत नाही.

8. शेतमालाची स्पर्धा

1991 साली भारताने खाजगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरण यांचा स्वीकार केला आहे. त्यामुळे संपूर्ण जग ही एक बाजारपेठ निर्माण झाली आहे.जगामध्ये स्पर्धा वाढली आहे.विकसित देश नव्या तंत्रज्ञानासोबत चालत आहेत. त्यामुळे त्या मालाला चांगली किंमत मिळत आहे. भारतासारख्या विकसनशील देशात याउलट परिस्थिती दिसून येते त्यामुळे भारतीय शेतमाल जागतिक स्पर्धेत टिकत नाही.तो स्थानिक बाजारात विकावा लागतो. परिणामी, आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

9. छुपी बेरोजगारी

शेतीमध्ये कुटुंबातील सर्वच लोक काम करत असतात.कारण, दुसरा व्यवसाय करण्याच्या संधी खूप कमी असतात.म्हणून सर्व सदस्य काम करीत असले तरी मिळणाऱ्या उत्पादनावर काहीच फरक पडत नाही. परिणामी,केलेले श्रम वायाला जातात.ते श्रम उद्योग व सेवा क्षेत्राकडे वळविल्यास कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडून राहणीमानाचा दर्जा वाढू शकतो.

10. शेतकरी आत्महत्या

शेतकऱ्यांना बँकांकडून पाहिजे तेवढे कर्ज मिळत नाही.शेतकऱ्यांना शेती क्षेत्रात नैसर्गिक कारणामुळे तोटे सोसावे लागतात.बँकांची व सावकार वर्गाची परतफेड न झाल्याने शेतकऱ्यांना जमीन विकावी लागते.त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा राहत नाही.त्यानंतर पश्चातापामुळे शेतकरी नाईलाजास्तव मरणाला जवळ करतो आणि शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत जाते.

11.पीकविमा

भारतातील अनेक घटक राज्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी विमा योजना जाहीर केली

आहे.शेतकऱ्यांना पिकाचे नुकसान झाल्यास भरपाई मिळावी हा यामागचा हेतू आहे.या योजनेचा हेतू चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नसल्यामुळे पीक विम्याचा सामान्य शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही.काही कृषी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत.

12. सिंचन सुविधा

भारतात जवळपास 40% शेतीला सिंचन सुविधा मिळतात. याचा अर्थ 60% शेती पावसाच्या पाण्यावर म्हणजेच कोरडवाहू स्वरूपाची आहे. पाऊस कमी झाला किंवा पाऊस जास्त झाला तरी भारतीय शेतीत तोट्याची परिस्थिती निर्माण होते. सिंचन सुविधा उपलब्ध असतील तर एक किंवा दोन पिके घेता येतात अनेक वेळा त्या पिकांच्या माध्यमातून उत्पादन खर्चही भरून निघत नाही.

13. जमिनीचे असमान वाटप

भारतात सधन शेतकरी,अल्पभूधारक,भूमीहीन शेतकरी अशी विभागणी आहे. परिणामी,दारिद्र्य बेकारीचे प्रमाण वाढत जाते पुढे वाढलेले दारिद्र्याचे प्रमाण हिंसक वळण घेते.

14. कृषी किमती

सरकारच्या वतीने शेतीमाल हमी किंमत जाहीर केली जाते.ही किंमत शेतकऱ्यांचे समाधान करणारी असतेच असे नाही. बऱ्याच वेळा हमी किमतीच्या माध्यमातून उत्पादन खर्चही भरून निघत नाही. शेतमाल हमी किंमत अशी असावी की उत्पादन खर्च भरून किमान 50% नफा प्राप्त व्हावा असे सरकारचे प्रयत्न असताना दिसून येते. पण त्याला पूर्ण यश मिळालेले दिसत नाही.

## संदर्भसूची

१. डॉ. कवीमंडन विजय, कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री गणेश प्रकाशन, नागपूर.

२. डॉ. रसाळ राजेंद्र, भारतीय अर्थव्यवस्था सक्सेस पब्लिकेशन, पुणे.

३. काटे आणि भोसले, विकास आणि पर्यावरण, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. डॉ. पाटील जे. एफ., वृद्धि व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. . डॉ. डी उशीर, डॉ. जावळे, डॉ एस. टिळे, डॉ. पगार, भारताचा आर्थिक विकास, निराली प्रकाशन, पुणे.

६. डॉ. जावळे आणि डॉ. उगले, भारतीय आर्थिक विकास, सक्सेस प्रकाशन, पुणे.

७. डॉ. देसाई आणि भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन, पुणे.